दैनिक www.esuryodaylive.com
महाराष्ट्र
# सूर्योदय
Email : dailysuryoday@gmail.com
मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
अक्षय संभाजी कामठे (संपादक पुणे आवृत्ती)

24 तास सेवा || श्री नागनाथ कृपा || प्रो.प्रा.यमपुरे अशोक 8014842121
सूर्योदय मेडिकल & जनरल स्टोअर्स
CHEMIST & DRUGIST
शुगर,बीपी,थायरॉड,अस्थमा तसेच मुंबई,पुणे,औरंगाबाद,
लातुर,बार्शी,सोलापुर,नगर येथील मेडिसिन मिळेल
सर्व प्रकारचे मेडिसिन घरपोच मिळतील
मन्मथस्वामी चौक,पाटोदा रोड,मांजरसुंबा ता.जि.बीड

बीड || वर्ष ६ वे || अंक ७५ || शुक्रवार १३ मार्च २०२६ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

# आरोग्य विमाधारक केंद्रबिंदू मानून विमा कंपन्या व रुग्णालयांनी सेवा द्यावी– आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

मुंबई : आरोग्य विमा कंपन्यांकडून क्लेम मंजुरीत येणाऱ्या अडचणी व रुग्णालयांची अवाजवी वैद्यकीय बिले याबाबतच्या तक्रारीच्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी मंत्रालयात, भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण, खासगी विमा कंपन्या व खासगी रुग्णालये यांची संयुक्त बैठक आयोजित केली होती. रुग्ण हा केंद्रबिंदू मानून खासगी विमा कंपन्या व रुग्णालयाने सेवा द्यावी असे निर्देश आरोग्यमंत्र्यांनी या बैठकीत दिले.ङ्ङआरोग्य विमा कंपन्यांकडून क्लेम मंजुरीत येणाऱ्या अडचणी व खासगी रुग्णालयाकडून आकारली जाणारी वाजवी बिले. याबाबत आरोग्यमंत्र्यांकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने याबाबत निश्चित कार्यपध्दती निर्धारीत करण्यासाठी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी मंत्रालयात बैठक आयोजित केली होती. बैठकीस रिलायन्स, टाटा, एसबीआय, स्टार हेल्थ, एचडीएफसी, एआयजी, यासह राज्यातील प्रमुख विमा कंपन्या तसेच व्होकार्ड, लीलावती, जसलोक, रिलायन्स यासह राज्यातील प्रमुख रुग्णालयांचे प्रतिनिधी उपस्थित होते.ङ्ङविमा कंपनी आणि रुग्णालय व्यावसायिक पद्धतीने काम करत असली तरी रुग्ण हा केंद्रबिंदू असला पाहिजे. आरोग्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार विमा कंपन्या, खासगी रुग्णालये, भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण व आरोग्य विभागाचे प्रतिनिधी एका व्यासपिठावर येऊन रुग्ण कल्याणासाठी निश्चित कार्यपध्दती निर्धारित करण्याबाबत चर्चा झाली.ङ्ङआरोग्यविमा घेणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर वाढत असुन त्यांना



समाधानकारक सेवा देणे हे रुग्णालये व विमा कंपन्यांची जबाबदारी आहे. याबाबत चुकीचे निदर्शनास आल्यास शासन त्याबाबत योग्य ती कार्यवाही करेल. राज्यात मुंबई, पुणे, नागपूर सारख्या शहरात अद्यावत वैद्यकीय सेवा, तज्ञ डॉक्टर्स, व पायाभूत सुविधा उपलब्ध असल्यामुळे, मेडिकल टुरिझम व्यवसायाला मोठा वाव आहे. चांगली सेवा देऊन आपली विश्वासार्हता वाढवावी असेही आरोग्यमंत्र्यांनी सांगितलेङ्ङराज्यातील सर्व रुग्णालयांनी भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण ( आयआरडीए ) च्या पोर्टलवर नोंदणी करून आवश्यक माहिती अद्ययावत ठेवावी, असे निर्देश देतानाच क्लेम मंजुरीसाठी निश्चित कालमर्यादा ठरविण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. हॉस्पिटल आणि विमा कंपन्यांमधील समन्वयाच्या अभावामुळे अनेकदा रुग्णांना मानसिक तसेच आर्थिक त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे रुग्णांना तात्काळ उपचार मिळावेत आणि क्लेम प्रक्रिया अधिक पारदर्शक व सुलभ व्हावी यासाठी शासन आवश्यक ते निर्णय घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.ङ्ङराज्यात सध्या सुमारे सात ते आठ हजार रुग्णालये विमा सेवा देत असून काही ठिकाणी गैरप्रकार होत असल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. अशा प्रकरणांमध्ये बॉम्बे नर्सिंग ॲक्ट अंतर्गत कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच मोठ्या रुग्णालयांनी उपचारांचे दर स्पष्ट करणारे दरपत्रक लावणे बंधनकारक करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली. एकाच आजारासाठी विविध रुग्णालयांमध्ये वेगवेगळे दर आकारले जात असल्याच्या पार्श्वभूमीवर स्टँडर्ड ट्रीटमेंट प्रोटोकॉल तयार करण्याची गरज बैठकीत व्यक्त करण्यात आली. तसेच विमा कंपन्या आणि रुग्णालयासाठी कॉमन 'एम्पॅनलमेंट यंत्रणा उभारण्याबाबतही विचार सुरू असल्याची माहिती आरोग्यमंत्र्यांनी दिली.ङ्ङयावेळी मंजूर व नाकारलेले क्लेम आणि प्राप्त तक्रारी याबाबतची माहिती नियमितपणे आरोग्य विभागाकडे सादर करण्यास सांगण्यात आले. भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण ( ) यांचेकडुन महाराष्ट्रातील तक्रारी प्राप्त करुन त्यावर अभ्यास व उपाययोजना करण्यात येणार असुन याबाबत कार्यवाही करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरणार आहे.ङ्ङवैद्यकीय व्यवसायातील विश्वासार्हता वाढविणे ही शासनाची प्राथमिकता असून कोणत्याही रुग्णाला उपचार किंवा विमा क्लेम मिळण्यात अडचण येऊ नये यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे आरोग्यमंत्री आबिटकर यांनी स्पष्ट केले. या बैठकीस आरोग्य सेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, आरोग्य संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, सहसंचालक डॉ. सुनीता गोल्हाइत तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# जागतिक महिला दिनाच्या मुहुर्तावर आरोग्य विभागाकडून एचपीव्ही लसीकरण आणि 'पिंक ओपीडी' चा शुभारंभ

मुंबई, : राज्यातील मुलींना गर्भाशय मुखाच्या (सर्व्हायकल) कर्करोगापासून संरक्षण मिळावे यासाठी ९ ते १४ वयोगटातील सुमारे ९ लाख ८४ हजार मुलींना एचपीव्ही प्रतिबंधक लस देण्याच्या मोहिमेचा तसेच 'पिंक ओपीडी'चा शुभारंभ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मुंबई येथे झाला.यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव निपुण विनायक, आरोग्य विभागाच्या आयुक्त डॉ. कांदबरी बलकवडे आणि इतर सर्व प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, ''आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत, बदललेल्या आहारपद्धतीत आणि वाढत्या तणावामुळे कर्करोगासारख्या गंभीर आजारांचे प्रमाण वाढताना दिसत आहे. त्यामुळे आजार झाल्यानंतर उपचार करण्यापेक्षा 'प्रिव्हेन्शन इज बेटर दॅन क्युअर' या तत्त्वानुसार प्रतिबंधात्मक





उपाययोजना करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. एचपीव्ही लसीकरण हा त्याच दिशेने टाकलेला मोठा आणि स्तुत्य पाऊल असल्याचे सांगितले.''त्यांनी सांगितले की, राज्यातील ९ ते १४ वर्षे वयोगटातील मुलींना एचपीव्ही लस देण्याची ही व्यापक मोहीम राबवली जात असून त्यामुळे गर्भाशय मुखाच्या कर्करोगावर प्रभावी प्रतिबंध घालता येईल. जागतिक स्तरावर कर्करोग हा गंभीर आरोग्यविषयक प्रश्न बनत असताना राज्य सरकार या संदर्भात सक्रिय पावले उचलत आहे.

माता सुरक्षित तर कुटुंब सुरक्षित

मुख्यमंत्री असताना राबवलेल्या 'माता सुरक्षित तर कुटुंब सुरक्षित' या उपक्रमाची आठवण करून देताना शिंदे म्हणाले की, त्या मोहिमेत ३ कोटी महिलांची तपासणी करण्यात आली होती. त्यापैकी जवळपास १० हजार महिलांमध्ये कर्करोगाचे प्रारंभिक निदान झाले. आजार पहिल्या टप्प्यात सापडल्यामुळे अनेक माताभगिनींचे प्राण वाचवणे शक्य झाले, याचा खरा आनंद आहे.

अलीकडेच सुरू करण्यात आलेल्या मेमोग्राफी तपासणीच्या आठ गाड्यांद्वारे गावागावात तपासणी सुरू असून आतापर्यंत २ कोटी ९१ लाख महिलांची तपासणी झाली आहे. गरज५ भासल्यास आणखी गाड्या उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्न करेल, असे त्यांनी सांगितले. यासाठी डीपीडीसी, जीएसआर तसेच राज्याच्या आरोग्य बजेटमधून निधी उपलब्ध करण्याचा विचार करता येईल, असेही त्यांनी नमूद केले.

राज्यातील अनेक रुग्णालयांच्या इमारती ६० ते ७० टक्के पूर्ण झाल्या असून त्या लवकरात लवकर १०० टक्के पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यासाठी कमी व्याजदरात निधी मिळवण्यासाठी एडीबी बँक, वर्ल्ड बँक यांसारख्या संस्थांकडूनही आर्थिक सहाय्य मिळवण्याचा प्रयत्न करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे शिंदे यांनी सांगितले.तसेच पीपीपी ( मॉडेलद्वारे आरोग्य क्षेत्रातील पायाभूत सुविधा उभारण्यालाही मान्यता देण्यात आली आहे. नामांकित संस्थांच्या सहकार्याने आधुनिक आरोग्य सुविधा उभारल्या जातील, ज्याचा लाभ सर्वसामान्य नागरिकांनाही मिळेल.

# पिंपळा भत्या येथील गोपाल चावडी व कृष्ण मंदिर विकासासाठी ३ कोटींची मंजुरी

पूर्णा (प्रतिनिधी):-तालुक्यातील मौजे.पिंपळा भत्या येथे असलेल्या श्री.क्षेत्र गोपाल चावडी मंदिर आणि श्री कृष्ण मंदिर परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासनाने तब्बल ३ कोटी रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता दिली आहे. या महत्त्वपूर्ण विकास कामांसाठी स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे.

परिणामी, या प्रशासकीय निर्णयामुळे परिसरातील धार्मिक, पर्यटन आणि सामाजिक विकासाला नवी गती मिळणार आहे.राज्य शासनाच्या प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत या कामांना अंतिम मंजुरी मिळाली असून मंदिर परिसराचा विकास अधिक सुबक, सुरक्षित आणि आधुनिक सुविधांनी परिपूर्ण करण्याचा उद्देश या माध्यमातून साध्य होणार आहे. मंदिर परिसरात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी पायाभूत सुविधा उभारण्यास या निधीमुळे मोठी मदत होईल, असा विश्वास आ.डॉ.गुट्टे यांनी व्यक्त केला.मंजूर करण्यात आलेल्या कामांमध्ये सुसज्ज भक्तनिवास बांधकामासाठी १ कोटी रुपये, मंदिर परिसरात संरक्षण भिंत व पेव्हर ब्लॉक बसवण्यासाठी १ कोटी रुपये, सोलार पथदिव्यांसाठी ५० लाख रुपये, तसेच सोलार हायमास्ट व अतिरिक्त पथदिव्यांसाठी ५० लाख रुपये अशा विविध कामांचा समावेश आहे. या सर्व कामांमुळे मंदिर परिसर अधिक सुरक्षित, प्रकाशमान आणि सुबक होणार असून भाविकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध होणार असल्याचेही आ.डॉ.गुट्टे यांनी नमूद केले.

# सभापतीपदी मनोज मुंडे, तर उपसभापती सारिका खांडेकर

गंगाखेड (प्रतिनिधी):-गेल्या काही वर्षांपासून प्रशासकराज असलेल्या गंगाखेड पंचायत समितीचा कारभार आला लोकशाही पध्दतीने चालण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. नुकत्याच झालेल्या पंचायत समिती निवडणुकीत निवडूण आलेल्या सर्व सदस्यांच्या बहुमताने सभापती म्हणून मनोज मुंडे, तर उपसभापतीपदी सारिका खांडेकर यांची निवड करण्यात आली आहे.

त्यामुळे पंचायत समितीवर कमळ फुलल्यामुळे स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांचे एकहाती वर्चस्व निर्माण झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

माजी जिल्हा परिषद सदस्य असलेले लक्ष्मण मुंडे यांचे चिरंजीव मनोज लक्ष्मण मुंडे यांची नवनिर्वाचित सभापती म्हणून वर्णी लागली आहे.

अवघे २६ वर्षीय युवक असलेले मनोज मुंडे हे सामाजिक बांधिलकी जपत सातत्याने लोकांशी संपर्क ठेवणारे आणि विकासकामांबाबत आग्रही असलेले नेतृत्व म्हणून ओळखले जातात. सभापतीपदी त्यांच्या निवडीमुळे पंचायत समितीच्या कामकाजाला अधिक गती मिळेल, तसेच तालुक्यातील विविध विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी होईल,

अशी अपेक्षा स्थानिक आ.डॉ.गुट्टे यांनी व्यक्त केली.

त्याचप्रमाणे उपसभापतीपदी निवड झालेल्या सारिका रमेश खांडेकर या देखील समाजकार्याची जाणीव ठेवून काम करणाऱ्या कार्यकर्त्या म्हणून परिचित आहेत. ग्रामीण भागातील प्रश्न सोडविण्यासाठी त्यांचा सक्रिय सहभाग आणि लोकाभिमुख दृष्टिकोन पंचायत समितीच्या कामकाजाला निश्चितच बळ देणारा ठरेल, असाही विश्वास असल्याचे आ.डॉ.गुट्टे यांनी नमूद केले.

तालुक्यातील पायाभूत सुविधा, शिक्षण, पाणीपुरवठा, आरोग्य आणि ग्रामीण विकासाच्या विविध क्षेत्रांमध्ये नव्या नेतृत्वाकडून सकारात्मक निर्णय होतील. तसेच गावखेड्यातील सर्वसामान्य लोकांच्या विश्वासाला पात्र ठरत दोघेही विकासाच्या कामांना प्राधान्य देतील, अशीही भावना आ.डॉ.गुट्टे यांनी व्यक्त केली.

# गंगाखेड येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

परभणी,: जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना खाजगी क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, परभणी व श्री संत जनाबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गंगाखेड यांच्या संयुक्त विद्यमाने आज (दि. ११) रोजी श्री संत जनाबाई महाविद्यालय, गंगाखेड येथे ''पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा'' आयोजित करण्यात आला. या मेळाव्यास उमेदवारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.जिल्ह्यातील बारावी, आयटीआय, डिप्लोमा, पदवी, बी.ई., पॉलिटेक्निक आदी शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांसाठी ट्रेनी ऑपरेटर, विमा सल्लागार, विमा सखी तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना आदी मिळून एकूण २०० पदांसाठी मुलाखती आयोजित करण्यात आल्या होत्या. या मेळाव्यास १६६ सुशिक्षित बेरोजगार उमेदवार उपस्थित होते. त्यापैकी ८३ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री संत जनाबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गंगाखेडचे प्राचार्य बी. एम. धूत होते. यावेळी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त प्र.सो.खंदारे यांनी उपस्थित उमेदवारांना मार्गदर्शन केले. नवयुगात तंत्रज्ञान, डिजिटल क्षेत्र, हरित ऊर्जा व आरोग्यसेवा क्षेत्रात रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होत असून आयटी, एआय, डेटा ॲनालिटिक्स, सायबर सुरक्षा तसेच इलेक्ट्रिक व्हेईकल (ईव्ही) तंत्रज्ञान यांसारख्या कौशल्यांना मोठी मागणी असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच जर्मनी व इस्त्रायलसारख्या देशांमध्येही कुशल कामगारांना संधी उपलब्ध होत असल्याचे त्यांनी नमूद केले. आयटीआय, तांत्रिक व कौशल्य विकास प्रशिक्षणामुळे उद्योगसुसंगत रोजगाराच्या संधी वाढत असल्याचेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक श्री. गिरी यांनी केले. रोजगार मेळावा यशस्वी करण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातील प्रवीण रुद्रकंठवार, राहुल गजभारे, करिमोदीन अन्सारी तसेच प्लेसमेंट सेलचे श्री. कलमे व महाविद्यालयीन कर्मचारीवृंद यांनी सहकार्य केले.

संपादकीय

## हवे हिरवे छत्र

शहरांच्या झपाट्याने होणाऱ्या विकासाच्या शर्यतीत शहरी वृक्षसंपत्तीचे महत्त्व वारंवार दुर्लक्षित केले जात आहे. प्रत्यक्षात झाडे ही केवळ सौंदर्य नव्हे, तर पर्यावरण आणि सार्वजनिक सुरक्षेची अत्यावश्यक पायाभूत सुविधा आहेत.

असा एकही पावसाळा जात नाही ज्यावेळेस आपल्याला दिसते की झाड गाडीवर कोसळते आणि झाडे पडून मानवी मृत्यू देखील होतात. मेट्रोचा खांब उभारण्यासाठी शेकडो वर्षे जगलेला वटवृक्ष एका रात्रीत तोडला जातो. रस्त्यालगतच्या झाडांमुळे पूर्वी सावली देणारा पदपथ आता उघड्या काँक्रीटची पट्टी बनतो. आपण क्षणभर हळहळतो आणि पुढे निघून जातो – परत उंच, रुंद, वेगाने विकास कामे उभारायला. विशेष म्हणजे याच प्रक्रियेत आपण त्याच-त्याच चुका वारंवार करत राहतो. झाडांकडे फक्त शोभेची वस्तू किंवा अडथळा म्हणून बघतो. मुख्य म्हणजे वृक्ष म्हणजे महत्त्वाची शहरी पायाभूत सुविधा आहे हे विसरतो.

भारत ऐतिहासिकदृष्ट्या अभूतपूर्व वेगाने शहरीकरणाकडे वाटचाल करत आहे. २०४७ पर्यंत आपल्या अर्ध्याहून अधिक लोकसंख्येचे वास्तव्य शहरांमध्ये असेल. मुंबई, पुणे, बंगळूरु, हैदराबाद, दिल्ली ही शहरे केवळ वाढत नाहीत, तर झपाट्याने कायापालट होत आहेत. रस्ते रुंद होत आहेत, उड्डाणपूल उभे राहत आहेत, मेट्रोच्या बोगद्यांसाठी जमिनीखाली खोदकाम सुरू आहे. या प्रत्येक कामाची एक किंमत असते जी प्रकल्पाच्या अंदाजपत्रकात कधीच दिसत नाही. आपल्या शहरी वृक्षसंपत्तीची किंमत, हे संवर्धनाचे म्हणणे नाही. हे पायाभूत सुविधांचे म्हणणे आहे आणि भारतातील शहर नियोजनकार अभियंते, महानगरपालिका अधिकारी आणि धोरणकर्त्यांनी हे स्पष्टपणे ऐकण्याची वेळ कधीच उलटून गेली आहे. झाडे विकासाच्या विरोधात नाहीत. योग्य व्यवस्थापन केल्यास ती स्वतःच विकास आहेत का महत्त्वाचा मूलमंत्र आहे.मी आर्बोरिस्ट आहे, असे सांगितले की अनेकदा समोरच्याचा प्रतिसाद फक्त विनम्रपणे मन डोलवण्यापुरता असतो आणि समज असतो की मी एखाद्या रोपवाटिकेत काम करतो किंवा विकेंडला कुंपण छाटतो. प्रत्यक्षात हे काम त्यापेक्षा कितीतरी अधिक तांत्रिक आणि कितीतरी अधिक महत्त्वाचे आहे. आर्बोरिकल्चर म्हणजे शहरी वातावरणातील वैयक्तिक झाडांचे व्यवस्थापन करण्याचे शास्त्र आणि कला. यात संरचनात्मक धोक्याचे मूल्यांकन, पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी वृक्ष-प्रभाव मूल्यांकन, मुळांच्या क्षेत्राचे व्यवस्थापन, बांधकामाच्या काळात झाडाचे छत्र जपणे, झाडांच्या आरोग्याचे निदान आणि झाड तोडणे व टिकवून ठेवणे यांशी संबंधित कायदेशीर व पर्यावरणीय चौकट यांचा समावेश होतो. हे प्रत्येक अर्थाने शहरी पायाभूत सुविधा व्यवस्थापनाचे एक शास्त्र आहे, जे भारताच्या मुख्य प्रवाहातील नियोजनातून जवळपास पूर्णपणे गायब आहे. एका प्रौढ झाडाचा शहरासाठी विचार करा. ते कार्बन शोषून घेते. बाष्पोत्सर्जनाने सभोवतालचे तापमान दोन ते चार अंशांनी कमी करते. पावसाचे पाणी जमिनीत मुरवते. हवेची गुणवत्ता सुधारते, ध्वनिप्रदूषण कमी होते, जैवविविधता टिकते आणि मानसिक स्वास्थ्य, मालमत्तेचे मूल्य आणि सामुदायिक एकात्मता यांवर त्याचे सिद्ध परिणाम होतात. हे हजारो झाडांच्या शहरी जंगलात गुणाकार करा. आर्थिक मूल्य थक्क करणारे आहे आणि ते गमावल्यावरची किंमतही तितकीच मोठी आहे. मुंबई देशाची आर्थिक राजधानी आहे. या शहरांमध्ये आर्बोरिकल्चरसाठी सर्वात मोठे आव्हान दिसते. कारण हे शहर असाधारण नैसर्गिक वारसा असलेले आहे – जुने वटवृक्ष जे संपूर्ण चौकांवर छत्र धरतात, किनारपट्टीचे रक्षण करणारी खारफुटीची जंगले, पिढ्यानपिढ्या शहराचे प्रदूषण आणि वेदना शांतपणे सहन करणारी झाडे आणि त्याच वेळी हे एक अखंड पायाभूत दबावाखाली असलेले शहर आहे. गेल्या दशकात एकट्या मुंबईत मेट्रो, किनारी रस्ता आणि महामार्ग प्रकल्पांसाठी हजारो झाडे तोडण्यात आली किंवा कायमची बाधित झाली. यातील काही तोडणे अपरिहार्य होते. अनेक नव्हती. यातील फरक – झाड वाचवणे आणि झाड तोडणे – हा बऱ्याचदा एवढाच असतो की नियोजनाच्या टप्प्यात प्रशिक्षित आर्बोरिस्ट त्या निर्णय प्रक्रियेत होता का? सुरक्षिततेचा आयाम तर आणखीच महत्त्वाचा आहे. मुंबईच्या गर्दीच्या रस्त्यांवर मुळांवर दबाव, चुकीच्या पद्धतीने छाटणी आणि बांधकामाच्या नुकसानीमुळे झाडे धोकादायक बनतात. संरचनात्मकदृष्ट्या कमकुवत झालेले झाड अप्रशिक्षित डोळ्यांना वर्षानुवर्षे हिरवेगार आणि निरोगी दिसू शकते आणि एक दिवस अचानक कोसळते.

प्रमाणित आर्बोरिस्टकडून जोखीम मूल्यांकन हे ऐषोआरामाची गोष्ट नाही ती सार्वजनिक सुरक्षा आहे.

# गोरेगाव 'लावण्यवती' फॅशन शो पर्व दुसरे यशस्वीरीत्या संपन्न.महिला सक्षमीकरण हेच आमचे मूळ उद्दिष्ट फॅशन डिझायनर प्रांजल खामगांवकर

विशेष प्रतिनिधी :
नंदकुमार चांदोरकर

मौजे गोरेगाव, दि. १२ मार्च २०२६ आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त फॅशन डिझायनर प्रांजल खामगांवकर यांच्या पुढाकारातून गोरेगाव येथे महिला सक्षमीकरणाच्या उद्देशाने 'लावण्यवती २०२६' या फॅशन शो स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.ङ्गमुंबई आणि पुणे येथे फॅशन डिझायनिंगचे शिक्षण घेत असताना प्रांजल खामगांवकर यांना नेहमीच आपल्या जन्मभूमी असलेल्या गोरेगाव शहरातील महिलांसाठी काहीतरी करण्याची प्रेरणा मिळत होती. आपण जिथे जन्मलो, वाढलो आणि प्राथमिक शिक्षण घेतले, त्या मातीतल्या लोकांसाठी काम करणे हे आपले कर्तव्य आहे, या भावनेतून त्यांनी मोठ्या शहरांमध्ये करिअरच्या अनेक संधी असतानाही त्या संधी नाकारत पुन्हा आपल्या गावी परतण्याचा निर्णय घेतला.ङ्ग२ डिसेंबर २०२३ रोजी त्यांनी गोरेगाव येथे 'प्रांजल स्टुडिओ' या नावाने स्वतःचे फॅशन बुटीक सुरू केले. महाड आणि माणगाव तालुका तसेच रायगड जिल्ह्यातील हे पहिले डिझायनर फॅशन बुटीक मानले जाते.




लहानपणापासून फॅशन डिझायनर होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या प्रांजल यांनी ते स्वप्न साकार केले आहे.ङ्गडिझायनर ड्रेस, नऊवारी साड्या, पारंपरिक पोशाख, वेडिंग ड्रेस तसेच वेस्टर्न ड्रेस शिवून देणे किंवा भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देणे, तेही अत्यंत परवडणाऱ्या दरात, अशी सेवा त्या देत आहेत. याशिवाय शिवणकाम, फॅशन डिझाईन, एम्ब्रॉयडरी, हँडक्राफ्ट आदी विविध प्रशिक्षण वर्गांचे आयोजनही त्यांच्या स्टुडिओमार्फत केले जाते.ङ्ग२०२५ मध्ये महिला दिनानिमित्त त्यांनी गोरेगाव येथे पहिल्यांदाच फॅशन शोचे आयोजन केले होते. गोरेगावमध्ये प्रथमच अशा प्रकारचा आगळावेगळा कार्यक्रम होत असल्याने महिलांनी त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.ङ्गयंदा महिला सक्षमीकरणाच्या दिशेने आणखी एक पाऊल पुढे टाकत प्रांजल आणि त्यांच्या टीमने रायगड जिल्ह्यातील महिलांसाठी 'प्रांजल स्टुडिओ प्रस्तुत लावण्यवती २०२६' या स्पर्धेचे आयोजन केले. या स्पर्धेला संपूर्ण जिल्ह्यातून महिलांचा मोठा प्रतिसाद मिळाला.ङ्गया कार्यक्रमासाठी सौ. विद्या देसाई (नगरसेविका, महाड नगर परिषद), सौ. अमृता हरवंडकर (माजी रायगड जिल्हा परिषद सदस्या) आणि आरती कुंभार (रायगड जिल्हाध्यक्षा, हिरकणी महिला मंडळ) यांनी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.ङ्गफॅशन शोपूर्वी महिला गृहउद्योग महोत्सवाचे उद्घाटन सौ. प्रियंका मेहता (भाजप महिला मोर्चा अध्यक्षा) आणि रेखा मोहिते (दामिनी अवॉर्ड विजेत्या महिला पोलीस कर्मचारी) यांच्या हस्ते करण्यात आले. गोरेगाव परिसरातील कर्तृत्ववान महिलांनी या महोत्सवात सहभाग घेऊन आपल्या हस्तकलेतील विविध वस्तूंचे प्रदर्शन व विक्री केली.ङ्गयानंतर फॅशन शोला सुरुवात झाली. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील ३० हून अधिक महिलांनी सहभाग घेतला. अंतिम फेरीत मिस लावण्यवती म्हणून खुशी भोईर, मिसेस लावण्यवती म्हणून देवश्री पितळे आणि प्रिन्सेस लावण्यवती म्हणून आरोही बागडे यांची निवड करण्यात आली. तसेच बेस्ट मेकअप आर्टिस्ट म्हणून नीलिशा खराडे यांचा सन्मान करण्यात आला.ङ्गसेजल कारभारी, विद्या सकपाळ, पायल टेंबे, सानवी चव्हाण, रेवती पवार, रिया पंदिरकर, नीलिशा खराडे आणि राजेश यादव यांनी मेकअप आर्टिस्ट म्हणून उत्कृष्ट कामगिरी करत स्पर्धेची शोभा वाढवली. प्रिया करंजीवकर आणि काजल पाखूरडे यांनी परीक्षक म्हणून आपली भूमिका उत्तमरीत्या पार पाडली.ङ्गस्पर्धेसाठी 'लावण्यवती ज्वेलर्स'च्या प्रो. प्रा. सौ. कीर्ती तांदळेकर यांनी ज्वेलरी पार्टनर म्हणून सहकार्य करून कार्यक्रम यशस्वी करण्यात विशेष योगदान दिले.

# चिपळूण अर्बन बँकेच्या प्रधान कार्यालय व मुख्य शाखेचा १९ मार्च रोजी उद्घाटन सोहळा

चिपळूण : कोकणात अग्रगण्य असलेली लोकप्रिय चिपळूण अर्बन बँकेच्या प्रधान कार्यालय आणि मुख्य शाखेचे उद्घाटन गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर गुरुवार दि.१९ मार्च रोजी महाराष्ट्राचे उद्योग मंत्री जिल्ह्याचे पालकमंत्री ना.उदय सामंत यांच्या हस्ते होणार आहे.ङ्गङ्गचिपळूण शहराच्या बँकिंग क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत असलेल्या चिपळूण अर्बन बँकेची प्रगती सातत्याने सुरू असून बँकेची नवी वास्तू आता लवकरच ग्राहकांच्या सेवेत येणार आहे.गुरुवार दि. १९ मार्च रोजी चिपळूण अर्बन बँकेच्या नव्या इमारतीचे भव्य उद्घाटन उद्योग मंत्री तथा रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री ना. उदय सामंत यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. शिवसेना नेते गुहागरचे



आमदार भास्कर जाधव, चिपळूण संगमेश्वर विधानसभा मतदारसंघाचे आमदार शेखर निकम, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था रत्नागिरीचे सोपान शिंदे, नगराध्यक्ष उमेश सकपाळ, चिपळूण अर्बन बँकेचे अध्यक्ष मोहन मिरगल उपाध्यक्ष धनंजय खातू, मुख्य कार्यकारी अधिकारी तुषार सूर्यवंशी, संचालिका राधिका पाथरे, निहार गुडेकर, निलेश भुरण, रहिमान दलवाई ,प्रशांत शिरगावकर, समीर जानवरकर, गौरी रेळेकर ,राजेश कळसकर, मिलिंद कापडी, रत्नदीप देवळेकर, समीर टाकळे ,सुनील खेडेकर ,संपदा रेडीज , दिलीप दळी, विवेक रेळेकर,दिनेश रेडीज ,श्रीराम देवळेकर, सतीश खेडेकर, विराज दळी, मधुसूदन माने आदी मान्यवर या कार्यक्रमाला विविध मान्यवर, बँकेचे पदाधिकारी, संचालक मंडळ, सभासद व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.चिपळूण अर्बन बँक ही अनेक वर्षांपासून ग्राहकांना विश्वासार्ह व दर्जेदार बँकिंग सेवा देत आहे. बँकेची नवी वास्तू अत्याधुनिक सुविधा व प्रशस्त जागेसह उभारण्यात आली असून यामुळे ग्राहकांना अधिक सोयीस्कर व जलद सेवा मिळणार आहे.या उद्घाटन सोहळ्याच्या निमित्ताने शहरात उत्साहाचे वातावरण असून बँकेच्या प्रगतीमुळे चिपळूणच्या बँकिंग क्षेत्रात आणखी भर पडणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# रत्नागिरी जिल्हा परिषदेचे आदर्श शाळा पुरस्कार जाहीर

उपसंपादक प्रदीप पवार

ग्रामीण भागातील शाळांच्या गुणवत्तावाढीसाठी देण्यात येणाऱ्या जिल्हा परिषद आदर्श शाळा पुरस्कार (जि.प. सेस योजना) अंतर्गत सन २०२५-२६ साठी तालुकानिहाय शाळांची निवड करण्यात आली आहे. या संदर्भातील जिल्हा पातळीवरील निवड समितीची बैठक ६ मार्च रोजी प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी वैदेही रानडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. आदर्श शाळा निवडीसाठी उपस्थितीचे शेकडा प्रमाण, सा.फु.द.पा. योजना, शैक्षणिक मार्गदर्शन, शासनाच्या विविध योजना, शैक्षणिक उठाव, 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' टप्पा क्र. २, शाळेतील उपक्रम तसेच नवभारत साक्षरता अभियान आदी निकषांचा विचार करण्यात आला. ङ्गजिल्ह्यातील कनिष्ठ प्राथमिक शाळा गटात पुढील शाळांची निवड करण्यात आली आहे.ङ्ग(मंडणगड) जि.प. प्राथमिक शाळा गांधी चौक, (दापोली) जि.प. प्राथमिक शाळा आंजर्ले नं. १, (खेड) जि.प. प्राथमिक शाळा आंबडस सोलकरवाडी, (चिपळूण) जि.प. प्राथमिक -शाळा आंबतखोल तांबडवाडी, (गुहागर) जि.प. प्राथमिक शाळा पाचेरीसडा नं. २, कवठीवाडी, (संगमेश्वर) जि.प. प्राथमिक शाळा तुरळ सुवरेवाडी,(रत्नागिरी) जि.प. प्राथमिक शाळा नाखरे भगवती नं. २, (लांजा) जि.प. प्राथमिक शाळा वेसुर्ले, (राजापूर) जि.प. प्राथमिक शाळा कोंडीवळे गोतावडेवाडी.ङ्गवरिष्ठ प्राथमिक शाळा गटात पुढील शाळांची निवड झाली आहे. ङ्ग(मंडणगड) जि.प. पूर्ण प्राथमिक शाळा पालघर (मराठी), (दापोली) जि.प. पूर्ण प्राथमिक शाळा शिर्दे, (खेड) जि.प. पूर्ण प्राथमिक शाळा चिंचघर दस्तुरी, (चिपळूण) जि.प. पूर्ण प्राथमिक शाळा वालोटी नं. १, (गुहागर) जि.प. पूर्ण प्राथमिक शाळा वरवेली नं. १, (संगमेश्वर) जि.प. पूर्ण प्राथमिक शाळा गोठणे पुनर्वसन हातीव, (रत्नागिरी) जि.प. पूर्ण प्राथमिक शाळा भोके मायंगडेवाडी, (लांजा) जि.प. पूर्ण प्राथमिक शाळा इसवली सुतार, (राजापूर) जि.प. पूर्ण प्राथमिक गोखले कन्या शाळा.ङ्गआदर्श शाळा पुरस्कार समितीच्या बैठकीस शिक्षणाधिकारी (प्राथमिक) निलीमा नाईक, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) चंद्रकांत सूर्यवंशी, प्राचार्य स.रा. देसाई अध्यापक विद्यालय विक्रांत रावराणे तसेच राज्य व राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षक माधव विश्वनाथ अंकलगे उपस्थित होते. या पुरस्कारा बद्दल शाळांचे मुख्याध्यापक, व्यवस्थापन समिती व पालक यांचे शिक्षणक्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

# वराडकरबेलोसे महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न

दापोली : आर. ही. बेलोसे एज्युकेशन फाउंडेशन, दापोली संचलित न. का. वराडकर कला, रा. वि. बेलोसे वाणिज्य (कनिष्ठ व वरिष्ठ), शांतिलाल जैन विज्ञान (कनिष्ठ) आणि इंदुमती यादव माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली यांचा शैक्षणिक वर्ष २०२५२६ चा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ १० मार्च रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.ङ्कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीताने झाली. प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड यांनी प्रस्ताविकातून उपस्थितांचे स्वागत करून महाविद्यालयाच्या स्थापनेपासून आतापर्यंत झालेल्या प्रगतीचा आढावा मांडला. महाविद्यालयाने उपलब्ध करून दिलेल्या सुविधा, विविध अभ्यासक्रम, गुणवत्तापूर्ण निकाल तसेच घडलेले विद्यार्थी यांची माहिती त्यांनी दिली. तसेच अलीकडील काळात महाविद्यालयाला प्राप्त झालेला नॅक ‘बी प्लस’ ग्रेड, संशोधन क्षेत्रातील कामगिरी आणि विविध शैक्षणिक उपक्रमांची माहितीही त्यांनी यावेळी मांडली.ङ्कयावेळी वरिष्ठ विभागातील कु. रिया वैद्य आणि कनिष्ठ विभागातील कु. प्राजक्ता कदम यांनी शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचा अहवाल सादर केला.ङ्कयानंतर व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल विविध पारितोषिके प्रदान करण्यात आली. विविध दात्यांच्या स्मरणार्थ देण्यात येणारे आदर्श विद्यार्थीविद्यार्थिनी गौरव पुरस्कारही प्रदान करण्यात आले.ङ्कै. हिराबाई रामचंद्र बेलोसे यांच्या स्मरणार्थ आदर्श विद्यार्थिनी गौरव पुरस्कार कु. रिया वैद्य () यांना प्रदान करण्यात आला.ङ्कप्राचार्य पारितोषिक आदर्श विद्यार्थी/विद्यार्थिनी (वरिष्ठ विभाग) गणेश वसावे व वेदिका वाघे () यांना देण्यात आले.ङ्कप्राचार्य पारितोषिक आदर्श विद्यार्थी/विद्यार्थिनी (कनिष्ठ विभाग) श्रीराम विजय आघरकर व आर्या भरत देवघरे यांना प्रदान करण्यात आले.ङ्कै. बाबा फाटक यांच्या स्मरणार्थ आदर्श विद्यार्थी पारितोषिक कैलास उजाळ () यांना रु. २५१/- व चषक देऊन प्रदान करण्यात आले.ङ्कै. भगतसिंह फाटक आदर्श विद्यार्थिनी पारितोषिक कु. प्रिया घडसे () व कु. फैमीदा राजपूरकर () यांना रु. २५१/- व चषक देऊन देण्यात आले.ङ्कयाशिवाय कला, क्रीडा, सांस्कृतिक,



एन.एस.एस., एन.सी.सी., ग्रंथालय विभाग आदी विविध विभागांतील ९० पेक्षा अधिक पारितोषिके विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आली.ङ्कपारितोषिक यादीचे वाचन प्रा. एफ. के. मगदूम यांनी केले. जिमखाना विभागाची माहिती डॉ. स्कंधा खेडेकर यांनी सादर केली, तर सांस्कृतिक विभागातील बक्षिसांची यादी प्रा. उत्तम पाटील यांनी वाचली.ङ्कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे दापोलीचे उपविभागीय अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महाविद्यालयांनी स्पर्धा परीक्षांकडे विशेष लक्ष देण्याची गरज अधोरेखित केली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शनासाठी जिल्ह्यातील आयएएस व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांना मार्गदर्शनासाठी उपलब्ध करून देण्यास प्रशासन सहकार्य करेल, असे त्यांनी सांगितले. तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या प्राध्यापकांचे मार्गदर्शन आत्मसात करून त्याचा जीवनात उपयोग करावा, असे आवाहनही त्यांनी केले.ङ्कविशेष उपस्थिती असलेले संस्थेचे कार्यवाह डॉ. दशरथ भोसले यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, आजचे युग तंत्रज्ञानाचे आहे. संस्थेच्या शाळांमध्ये एआय () आणि रोबोटिक्स यांसारखे आधुनिक विषय समाविष्ट करण्यात आले आहेत. भविष्यातील २०४०४५ मधील बदलांना सामोरे जाण्यासाठी आजच्या विद्यार्थ्यांनी आतापासूनच स्वतःला तयार ठेवले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.ङ्कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन मा. धनंजयराव यादव होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी पारंपरिक व्यवसायांपेक्षा वेगळा विचार करून विद्यार्थ्यांनी उद्योजकतेकडे वळावे, असे आवाहन केले.ङ्कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. एल. पी. पाटील यांनी आभार प्रदर्शन केले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दीपक गडकर यांनी केले.ङ्कया कार्यक्रमास संस्थेचे उपसभापती श्री. प्रियदर्शन बेलोसे, सहकार्यवाह अनंत सणस, विश्वस्त श्रीमती मीनाकुमार रेडीज, माजी सभापती श्रीमती जानकीताई बेलोसे, संचालक सुनील चव्हाण, नझिर अरकटे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.ङ्कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# लोकरंजन

१ सिनेरंग

उन्हाळ्याच्या सुट्टीत पुरेपूर मनोरंजन करणारा ‘‘पिक्चर बॉईज‘‘

चित्रपटात हिरो बनण्यासाठी धडपड करणाऱ्या तरुणांची गोष्ट आता पिक्चर बॉईज या चित्रपटातून पाहता येणार आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीत १५ मे पासून हा चित्रपट सर्वत्र प्रदर्शित होणार असून, प्रेक्षकांना कॉमेडीचा डोस मिळणार आहे. चित्रपटाचं दमदार पोस्टर नुकतेच सोशल मीडियावर लाँच करण्यात आलं आहे. त्रिमूर्ती फिल्म्सनं पिक्चर बॉईज या चित्रपटाची निर्मिती केली आहे. रवी पांडुरंग पंडितपवार, राजा पांडुरंग पंडितपवार हे या चित्रपटाचे निर्माते असून शिवाजी केशव पाटील हे सहनिर्माते आहेत. चित्रपटाची कथा, पटकथा, संवादलेखन आणि दिग्दर्शन निलेशसिंग राजपूत यांनी केलं आहे. सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे, जसराज जोशी, स्वप्नील गोडबोले, वरुण लिखाते, एल. के. लक्ष्मीकांत यांनी चित्रपटातली गाणी गायली आहेत. चित्रपटातूनच चित्रपटाची गोष्ट सांगण्याचा प्रकार या पूर्वी अनेकदा हाताळला गेला आहे. मात्र, चित्रपटात हिरो बनण्याची धडपड असलेल्या तरुणांची गोष्ट विनोदी, मनोरंजक पद्धतीनं मांडण्याचा प्रयत्न ‘‘पिक्चर बॉईज‘‘ या चित्रपटातून करण्यात आला आहे. प्रतीक लाड, हंसराज जगताप, अरबाज शेख, घनश्याम दरवडे (छोटा पुढारी) आणि इतरही नव्या जुन्या कलाकांची फळी चित्रपटात आहे. त्यामुळे उन्हाळ्याच्या सुट्टीत पुरेपूर मनोरंजन करणारा ‘‘पिक्चर बॉईज‘‘ हा चित्रपट चित्रपटगृहात जाऊन पाहणं पर्वणीच ठरणार आहे.




२फुलातून उलगडणार मुरळीची संघर्षमय कथा!!

अस्सल मराठी मातीतल्या वाघ्या-मुरळीची संघर्षमय कथा आगामी फुला चित्रपटातून मोठ्या पडद्यावर पहायला मिळणार आहे. नुकतेच या चित्रपटाचं पोस्टर खंडेरायाच्या साक्षीने जेजुरी येथे वाघ्या-मुरळी परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. मार्तंड साठे यांच्या हस्ते लाँच करण्यात आले याप्रसंगी चित्रपटाचे निर्माते , दिग्दर्शक, कलाकार आणि तंत्रज्ञ मंडळी उपस्थितीत होती. हा चित्रपट येत्या १७ एप्रिलला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे

अभिषेक जावीर दिग्दर्शित या चित्रपटाची पटकथा रवीकिरण जावीर यांनी लिहिली आहे.

‘‘फुला‘‘ ही एका मुरळीच्या पोटी जन्मलेल्या निरागस मुलीची संघर्षमय कथा आहे. तमाशा फड, जागरण गोंधळ या पारंपरिक सांस्कृतिक पटावर आधारित ही गोष्ट महाराष्ट्राच्या लोकपरंपरेतून आकार घेते. चित्रपटाविषयी दिग्दर्शक अभिषेक जावीर म्हणाले, ‘‘फुला‘‘ हा चित्रपट म्हणजे केवळ एका मुलीची शोकांतिका नाही, तर तो महाराष्ट्राच्या पारंपरिक लोककलांमध्ये अड़कलेल्या स्त्री कलाकारांच्या अस्तित्त्वाचा जीवंत दस्तावेज आहे. मुरळी परंपरेत अनेक स्त्रियांना कधीही त्यांची स्वप्नं, हक्क, प्रेम, सन्मानाने जगण्याची संधी मिळत नाही. समाज त्यांची कला घेतो, पण त्यांना माणूस म्हणून जगू देत नाही. वास्तवाचं प्रामाणिकपणे चित्रण करण्याचा प्रयत्न या चित्रपटाद्वारे केला आहे.

३ टेलीरंग

अनोळखीला मिळणार सोबतीचा मान सप्तपदी घेत होणार शुभमंगल सावधान;

सन मराठीवरील तू अनोळखी तरी सोबती या मालिकेने कमी कालावधीतच लोकप्रियता मिळवली आहे. मालिकेतील मुख्य पात्र समीर आणि अर्पिता यांच्या हळुवार फुलणाऱ्या मैत्रीने प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. दोन अनोळखी लोक एकमेकांच्या आयुष्यात येणं आणि त्यांचा एकेमकांच्या सोबतीने होणार प्रवास रंजकतेने या मालिकेतून दाखवला जातोय. मात्र सध्या अर्पिता व समीरची मैत्री सगळ्यांनाच खटकत असल्यामुळे दोघेही एकमेकांशी बोलणं टाळूया असं ठरवतात. तर एकीकडे अर्पिता आणि विराज तर दुसरीकडे समीर आणि राजसी यांच्या लग्नाची लगबग सुरु आहे. अर्पिता व समीर यांनी घरच्यांच्या सुखासाठी मनाविरुद्ध लग्न कारण्यासाठी होकार दिला आहे. नुकताच मालिकेचा नवा प्रोमो प्रेक्षकांच्या भेटीला आला असून त्यामध्ये लग्नाच्या तयारीची धामधूम दिसत आहे. रुखवताची तयारी, साड्यांचा बस्ता, पत्रिका अशा सगळ्या गोष्टींची लगबग सुरू असल्याचं प्रोमोमध्ये पाहायला मिळत आहे. पण या लग्नामुळे अर्पिता खरंच आनंदी आहे का? नेहमीच घरच्यांचा विचार करणाऱ्या अर्पिताच्या नशिबात नक्की काय लिहिलं आहे? नियती अर्पितासाठी नेमकं काय ठरवणार? या सर्व प्रश्नांची उत्तर रविवारी दुपारी १ व सायं. ७:३० वाजता २ तासांच्या विशेष भागातून पाहायला मिळणार आहे सन मराठीवर

४अनुपमामध्ये होणार सचिन त्यागींची एंट्री

स्टार प्लसवरील प्रेक्षकांच्या अत्यंत आवडीची असलेली मालिका म्हणजे अनुपमा ! सध्या या बहुचर्चित मालिकेत मोठा ट्विस्ट आला असून आता टेलिव्हिजन विश्वात चर्चांना उधाण आलं आहे. बऱ्याच दिवसांपासून ज्या नव्या कलाकाराच्या एन्ट्रीबाबत तर्कवितर्क लावले जात होते त्यावर आता अधिकृत शिक्कामोर्तब झाले असून तो कलाकार दुसरा कोणी नसून सचिन त्यागी असल्याचं कळतंय. नुकत्याच रिलीज झालेल्या टीझरमध्ये त्यांच्या एंट्रीची विशेष झलक दाखवण्यात आली असून तरी त्यांच्या पात्राबद्दलची माहिती मात्र निर्मात्यांनी अजून गुप्त ठेवली आहे त्यामुळे अनुपमा मालिकेच्या कथेत ते काय नवीन घेऊन येणार याबाबत प्रेक्षकांची उत्सुकता आणखी वाढली आहे.

टीझरमध्ये केवळ एक झलक दाखवण्यात आली असून यामुळे त्यांच्या आणि अनुपमामधील नात्याबद्दल अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. ते नेमके कोण आहेत? आणि त्यांच्या एंट्री ने काय घडणार मालिका नक्की काय ट्रॅक वर जाणार हे बघण उत्कंठावर्धक ठरतंय.

सचिन त्यागी हे नाव टेलिव्हिजन विश्वासाठी आणि प्रेक्षकांसाठी अजिबात नवीन नाव नाही. यापूर्वी त्यांनी ये रिश्ता क्या कहलाता है या मालिकेत मनीष गोयंका ही भूमिका साकारत प्रेक्षकांची मने जिंकली होती. कार्तिक गोयंका यांचे सन्माननीय आणि भावनिक स्तर असलेले वडील म्हणून त्यांची भूमिका या दीर्घकाळ चाललेल्या मालिकेचा महत्त्वाचा आधारस्तंभ ठरली होती आणि प्रेक्षकांकडून त्यांना भरभरून प्रेम आणि प्रशंसा मिळाली होती.अनुपमामध्ये झालेली सचिन त्यागींची ही खास एंट्री कथानकात मोठा बदल घडवणार का ? हे बघणायसाठी सगळेच आतुर आहेत.



**संकलन संयोजन**
**सुबोध रणशेवरे**
**संपर्क -९८३३१४६३५६**
**इमेल -**
subodh.ranshevre
@rediffmail.com

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक सूर्योदय
शुक्रवार १३ मार्च २०२६



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

# सुधागड येथील उंबरवाडी येथे जागतिक महिला दिनानिमित्त ‘सक्षम नारी शक्ती’ कार्यक्रम उत्साहात संपन्न

सुधागड पाली/ राम तुपे

सुधागड तालुक्यातील उंबरवाडी येथे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दि प्राईड इंडिया व रोटरी क्लब ऑफ बॉम्बे पियर यांच्या शाश्वत ग्राम प्रकल्पाच्या माध्यमातून गावातील महिलांसाठी ‘सक्षम नारी शक्ती’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात महिलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.ङ्ङकार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून निवृत्त मुख्याध्यापिका श्रीमती संध्या नामदेव तुरे उपस्थित होत्या. त्यांनी महिलांना मार्गदर्शन करताना स्त्रीशिक्षणाचे महत्त्व आणि समाजातील लिंगभेद याबाबत सविस्तर माहिती दिली. ग्रामीण भागामध्ये अनेकदा मुलींना माध्यमिक शिक्षणानंतर पुढील शिक्षण किंवा कौशल्याधारित प्रशिक्षणाची संधी मिळत नाही, ही बाब चिंताजनक असल्याचे त्यांनी सांगितले. आज शासनाने मुलींच्या शिक्षणासाठी आणि प्रगतीसाठी विविध योजना उपलब्ध करून दिल्या आहेत. तसेच प्राईड इंडिया संस्था देखील महिलांच्या सक्षमीकरणासाठी ठामपणे कार्यरत आहे. त्यामुळे या संधींचा लाभ घेऊन आपल्या मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन द्यावे आणि बचत गटांच्या माध्यमातून महिलांनी सक्षमीकरणाच्या चळवळीत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.ङ्ङयानंतर तज्ञ मार्गदर्शक श्रीमती रजनी हेमंत राऊत यांनी महिलांना आरोग्य व पोषण याविषयी मार्गदर्शन केले. निरोगी आणि तंदुरुस्त जीवनासाठी संतुलित व पोषक आहाराचे महत्त्व त्यांनी समजावून सांगितले. महिलांनी स्वतःच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.ङ्ङकार्यक्रमामध्ये महिलांसाठी विविध मनोरंजक आणि कौशल्याधारित स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. संगीत खुर्ची, केसात स्ट्रॉ घालणे, प्रश्नमंजुषा आदी स्पर्धांमध्ये महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपले कौशल्य दाखवून दिले. स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महिलांना बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. त्यामुळे संपूर्ण कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.ङ्ङहा उपक्रम संस्थेच्या मानद संचालिका श्रीमती ईशादिदी मेहरा, कोकण विभागीय व्यवस्थापक डॉ. विरेंद्र कुलकर्णी आणि वरिष्ठ कार्यक्रम व्यवस्थापक श्री. वसंत मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रकल्प समन्वयक श्री. रुपेश धामणस्कर यांच्या नियोजनानुसार यशस्वीरीत्या पार पडला.ङ्ङकार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेच्या कार्यकर्त्या स्नेहा खामकर, वेदश्री पाचपांडे, सुभाष धानिवले तसेच स्वयंसेवक संदीप वारगुडे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच गावातील ग्रामस्थ दिनेश नारायण वारगुडे, ग्रामपंचायत सदस्या संजना दिनेश वारगुडे, पार्वती चंद्रकांत वारगुडे, सुरेश नारायण हंबीर, ज्ञानेश्वरण अंबाजी हंबीर, गीता अरविंद कुशा हंबीर, लता पांडुरंग वारगुडे, प्रणाली प्रताप हंबीर, प्रदीप गंगाराम हंबीर, राम काशीराम शिद, सुधीर रघुनाथ हंबीर, यमुना गोविंद वारगुडे, पूजा रवींद्र शिद यांचा मोलाचा सहभाग लाभला.



# तळा पंचायत समिती सभापती पदी नथुराम मुकण तर उपसभापती पदी रवींद्र मांडवकर यांची बिनविरोध निवड : राष्ट्रवादीची एकहाती सत्ता




तळा प्रतिनिधी कृष्णा भोसले

तळा पंचायत समिती सभापती पदी नथुराम मुकण तरङ्गउपसभापती पदी रविंद्र मांडवकर यांची बिनविरोध निवड झाली आहे.ङ्ग सभापती पदी व उपसभापती पदी एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने २ नंतर झालेल्या छाननी व एकमेव अर्जावर शिक्का मोर्तब झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी तथाङ्गतहसीलदार स्वाती पाटील यांनी त्यांची निवड जाहीर केली.ङ्गत्यानंतर सभापती व उपसभापती व सदस्य यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वंदन केले त्यानंतर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला हार घालून अभिवादन केले. त्यानंतर खुर्ची वर स्थानापन्न होत सर्व कार्यकर्ते व उपस्थित मंडळींनी शाल, पुष्पगुच्छ देत त्यांचे जोरदार स्वागत केले.ङ्गयावेळी राष्ट्रवादीचे अध्यक्ष नाना भौड, माजी सभापतीङ्गचंद्रकांत रोडे, महीला तालुका अध्यक्षा जान्हवी शिंदे,ङ्गपरशुराम वरंडे,कृष्णा चाळके, तालुक्यातील सरपंच, उपसरपंच, राष्ट्रवादीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



नागोठणे विभागातील सामाजिक कार्यकर्ते व उत्तम फोटोग्राफर नितीन पत्की यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना नवनिर्वाचित जिप सदस्य सुमित काते, माजी ग्रा.पं. सदस्य प्रकाश मोरे व अन्य पदाधिकारी दिसत आहेत.ङ्ग(छाया–: नारायण म्हात्रे, सहसंपादक)



## ग्रुप ग्रामपंचायत पोयनाड

मु. पो. पोयनाड, ता.अलिबाग, जि. रायगड.

जा.क्र. ६६२

दिनांक : ०२।३।२०२६

जाहिर निविदा

प्रशासक आदेश –३४१ दि ०२/३/२६

प्रति,

ग्रुप ग्रामपंचायत पोयनाड, ता.अलिबाग, जि.रायगड कडुन खालील काम करण्यासाठी जाहीर निवीदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | कामाची मुदत/महिने |
|---|---|---|---|
| १ | ग्रुप ग्रामपंचायत पोयनाड मौजे आंबेवाडी, ता.अलिबाग व्यायामशाळा बांधणे | १४०००००/– | ३ महीना |

अटी व शर्ती :–

१) निवीदा/दरपत्रके मोहोरबंद पाकीटात मा.सरपंच ग्रामपंचायत पोयनाड यांचे नावे दि. १६/०३/२०२६ ते दि. २३/०३/२०२१ रोजी पर्यत सुट्टीचे दिवस सोडून सकाळी १० ते १ वाजे पर्यत कार्यालयीन वेळेमध्ये ग्रामपंचायत कार्यालयात स्विकारण्यात येतील.

२)ग्रुप ग्रामपंचायत पोयनाड हद्दीतील स्थानिक ठेकेदाराचा विचार केला जाईल.

३) कोणत्याही एक किंवा सर्वच निवीदा/दरपत्रके स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे

४) कोणत्याही नामंजुर निवीदा/दरपत्रके संदर्भात संबंधित ठेकेदारास कुठलाही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

५) सदर कामाचे अंदाजपत्रक ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेस पहावयास मिळतील

६) दिलेल्या मुदतीनंतर आलेली निविदा/दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.

७) या कामासाठी आलेल्या निवीदा/दरपत्रके पैकी कोणत्याही निवीदा/दरपत्रके किंवा सर्व निवीदा/दरपत्रके कोणतेही कारण न देता फेटाळण्याचे अधिकार राखून ठेवण्यात आले आहेत आणि निवीदा/दरपत्रके पाठविण्याच्या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला निवीदा/दरपत्रके फेटाळण्याबद्दल स्पष्टीकरण मागता येणार नाही.

८) ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निवीदा/दरपत्रके दि.२४/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा ग्रामपंचायत कार्यालयात मा.सरपंच यांचे समक्ष उघडण्यात येतील.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड

श्री. बाळासाहेब सखाराम येडके
प्रशासक
ग्रुप ग्रामपंचायत पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड

# ॲड. प्रथमेश सोमन यांचा गावकरी चालक मालक संघटनेकडून सत्कार

पनवेल शहर प्रतिनिधी(गणेश पाटील)

पनवेल महानगरपालिकेमध्ये स्वीकृत नगरसेवक म्हणून निवड झाल्याबद्दल ॲडवोकेट प्रथमेश सोमन यांचा गावकरी चालक मालक संघटनेतर्फे सत्कार करण्यात आला. संघटनेचे अध्यक्ष श्री. रेहमान सेठ, सरचिटणीस श्री. गणेश तु. पाटील, खजिनदार श्री. अशोक धोत्रे व सह खजिनदार श्री. बाळू निमसे यांच्या हस्ते त्यांना शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन



गौरविण्यात आले.ङ्गयावेळी उपस्थित मान्यवरांनी ॲड. प्रथमेश सोमन यांचे अभिनंदन करत पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. पनवेल शहराच्या विकासासाठी तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी त्यांनी कार्य करावे, अशी अपेक्षा देखील व्यक्त करण्यात आली.ङ्गया कार्यक्रमाला संघटनेचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड– ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )